## जिल्हा परिषद, कोल्हापूर

## विधीज्ञ पॅनेलवर विधीज्ञ नियुक्तीसाठी अर्ज मागणी जाहिरात सन २०२२-२३

जिल्हा परिषद, कोल्हापूर मधील विविध विभागांतर्गत उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांचे कायदेविषयक काम पहाणेकरीता खाली नमूद केलेप्रमाणे विधीज्ञ नियुक्तीसाठी इच्छूक विधीज्ञांच्याकडून दि.०८/१२/२०२२ अखेर अर्ज मागणी करणेत येत आहेत. विहीत नमुन्यातील अर्ज हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, कोल्हापूर याठिकाणी समक्ष अथवा टपालाव्दारे सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | न्यायालय | नियुक्त करावयाची विधीज्ञ संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा स्तर दिवाणी न्यायालय | ९ |
| २ | कामगार व औद्योगिक न्यायालय | ४ |
| ३ | फौजदारी न्यायालय | २ |
| ४ | तालुकास्तरीय न्यायालय - प्रत्येक तालुक्यासाठी १ याप्रमाणे (करवीर वगळून) | ११ |

- **प्राथमिक पात्रताविषयक अटी :-**

१) भारतीय नागरीक असणे आवश्यक.

२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी

३) अर्ज सादर करणेच्या अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय किमान ३३ वर्षे व कमाल ५८ वर्षे असावे.

४) वकीली सनद प्राप्त केल्यानंतर कमीत कमी १० वर्षाचा प्रत्यक्ष वकीली व्यवसायाचा अनुभव असावा.

५) स्थानिक स्वराज्य संस्थेत कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**६) जिल्हा परिषद पॅनेलवर सद्यस्थितील नियुक्त असलेल्या असलेल्या विधीज्ञांची त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या प्रकरणांचे निकाल जिल्हा परिषदेचे बाजूने झाल्याबाबतचे प्रमाणे विचारात घेऊन पुन्हा नियुक्तीबाबत विचार करणेत येईल्. याबाबतचा तपशिल अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.**

- **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) विधी शाखा पदवी प्रमाणपत्र

२) बार कौन्सिल सनद मिळालेची प्रत

३) वकीली व्यवसायाच्या अनुभवाबाबत स्थानिक बार कौन्सिलचे प्रमाणपत्र

४) वयाच्या पुराव्यासाठी माध्यमिक शाळा उत्तिर्ण प्रमाणपत्र किंवा इतर समकक्ष पुरावा.

अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- इच्छूक ऊमेदवारांनी सोबतचे विहीत नमुन्यातील अर्ज हा **दि. /११/२०२२** अखेर सांयकाळी ५.०० वा. पर्यंत स्विकारणेत येतील. टपालाव्दारे पाठविण्यात येणारे अर्ज हे सदर अंतिम तारखेपर्यंत प्राप्त होतील तेच स्विकारणेत येतील. विहीत मुदतीनंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच **अर्जाच्या लिफाफ्यावर कोणत्या स्तरावरील न्यायालयासाठी अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमूद करणेत यावे. जाहिराती प्रसिध्द होणेपूर्वी आलेल्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

पान नं. २ वर...

Scanned with CamScanner

- **वकील फी :-** वकील फी चे दर व निकष हे खालीलप्रमाणे राहतील

| अ.क्र. | तपशिल | विहीत केलेली फी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा स्तर दिवाणी न्यायालय | रु.६०००/- फी + रु.१०००/- खर्च | केसच्या सुरवातीस एकूण रक्कमेच्या ५०% व निकालानंतर ऊर्वरीत ५०% |
| २ | तालुका स्तर दिवाणी न्यायालय | रु.४०००/- फी + रु.१०००/- खर्च | वरिलप्रमाणे |
| ३ | कामगार व औद्योगिक न्यायालय | रु.४०००/- फी + रु.१०००/- खर्च | वरिलप्रमाणे |
| ४ | जिल्हा ग्राहक न्यायालय | रु.४०००/- फी + रु.१०००/- खर्च | वरिलप्रमाणे |
| ५ | शाळा न्यायाधिकरण व मोटर अपघात न्यायाधिकरण | रु.४०००/- फी + रु.१०००/- खर्च | वरिलप्रमाणे |
| ६ | विविध महसूल न्यायाधिकरण भूमी अभिलेखासह | रु.३०००/- फी + रु.१०००/- खर्च | वरिलप्रमाणे |
| ७ | स्थानिक न्यायालय कॅव्हीएट दाखल करणे | रु.१५००/- + विहीत खर्च | प्रति कॅव्हीएट कोर्ट खर्चासह कॅव्हीएट दाखल झालेवर आदा |
| ८ | कायदेशिर नोटीस देणे अथवा नोटीसीस उत्तर देणे | रु.१०००/- फी + रु.५००/- खर्च | कार्यवाहीनंतर आदा |
| ९ | रिट याचिकेचे पॅरावाईज म्हणणे तयार करणे | रु.१०००/- फी + रु.५००/- खर्च | कार्यवाहीनंतर आदा |
| १० | कायदेविषयक अभिप्राय / सल्ला देणे | रु.५००/- | कार्यवाहीनंतर आदा |

- **वरिल फी चे अनुषंगाने इतर बांबी खालीलप्रमाणे राहतील.**

१) वर नमूद खर्चामध्ये न्यायालयात सादर करावयाचे लेखी म्हणणे, जादा म्हणणे, दावा दुरुस्ती व विधीज्ञांनी न्यायालयात सादर करावयाच्या अर्जाचे टायपिंग, निकालाची प्रत मागणी इ. खर्चाचा समावेश आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने रिट याचिका, दावा किंवा अपील दाखल करतांना न्यायालयीन फी भरावी लागत असल्यास ती अतिरिक्त देय राहील.

२) एकाच विषयाचे / स्वरुपाचे दावे एकापेक्षा अधिक कर्मचाऱ्यांनी स्वतंत्रपणे दाखल केल्यास त्यामध्ये विधीज्ञ फी पहिल्या दाव्यांस पूर्ण दराने व त्यापुढील प्रत्येक दाव्यास एकूण फी चे ५०% दराने देय राहील.

३) विधीज्ञ यांचेकडे सोपविलेल्या प्रकरणांनूसार कांहीवेळा कार्यक्षेत्राबाहेरील न्यायालयात उपस्थित राहून काम पहावे लागल्यास, अशा प्रकरणी प्रवास भत्ता व दैनिक भत्ता हा फी व्यतिरिक्त वर्ग - २ चे अधिकाऱ्यांना देय असलेल्या दराने आदा करणेत येईल.

- **निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा (कंत्राट सेवा) १९६३ नूसार जिल्हा परिषदेमधील विहीत केलेल्या समितीमार्फत पॅनेलवर विधीज्ञ निवड करण्यात येईल.

पान नं. ३ वर...

Scanned with CamScanner

- **पॅनेलवर नियुक्त विधीज्ञ यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

१) विधीज्ञ यांनी त्यांच्याकडे सोपविलेल्या प्रकरणांचे संपूर्ण कामकाज पहाणे.

२) सोपविलेल्या प्रकरणांमध्ये गुणवत्ता व गतिमानता ठेवणे

३) जिल्हा परिषदेच्या हिताचे संवर्धन होईल यादृष्टीने प्रशासकीय बाबींची माहिती तसेच शासन निर्णय, परिपत्रक, नियम पुस्तिका याचा आधार घेऊन न्यायालयात जिल्हा परिषदेची बाजू पूर्ण प्रभावाने मांडणेची आहे.

४) न्यायालयीन प्रकरणांतील याचिकेनूसार म्हणणे, प्रतिज्ञापत्र, पुराव्याची कागदपत्रे इ. अनुषंगिक बांबींची पूर्तता वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घेणेची आहे.

५) न्यायालयीन प्रकरणांबाबत आवश्यक ती गोपनियता बाळगणेची आहे.

६) पॅनेलवर नियुक्त झालेल्या विधीज्ञ यांना जिल्हा परिषद वादी / प्रतिवादी असलेल्या न्यायालयीन प्रकरणांत जिल्हा परिषदेच्या विरोधात वकीलपत्र स्विकारता येणार नाही. असे घडलेचे निदर्शनास आलेस त्यांची पॅनेलवरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

- **इतर अटी व शर्ती :-**

१) विधीज्ञ पॅनेल कालावधी एक वर्ष राहील व त्यांनतर आवश्यकतेनूसार मुदतवाढ दिली जाईल.

२) पॅनेलवरील विधीज्ञ यांचेकडे सोपविलेल्या प्रकरणात ते जिल्हा परिषदेची बाजू न्यायालयामध्ये प्रभावीपणे मांडत नसलेचे किंवा टाळाटाळ केलेचे निदर्शनास आलेस सदर प्रकरणातील वकीलपत्र रद्द करणेत येईल अथवा पॅनेलवरील नियुक्ती संपुष्टात आणणेत येईल

३) न्यायालयीन प्रकरणे सोपवितांना दाव्याचा विषय, त्या अनुषंगाने इतर प्रकरणांतील कामकाजीमधील नैपुण्यता इ.बार्बीचा विचार करुन प्रकरणे सोपविण्यात येतील.

४) न्यायालयीन प्रकरणांबाबत जिल्हा परिषदमध्ये होणाऱ्या मिटींगला उपस्थित राहून सोपविलेल्या प्रकरणांची सद्यस्थिती व त्यावर पुढील कोणती कार्यवाही करणे आवश्यक आहे याची माहिती देणे बंधनकारक राहील.

**सही/-**
(संजयसिंह चव्हाण)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर.**

Scanned with CamScanner

# अर्जाचा नमुना

## जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत विधीज्ञ पॅनेलवर नियुक्तीसाठी अर्ज

**फक्त कार्यालयीन वापरांसाठी :-**

| अर्ज क्रमांक | अर्ज प्राप्त दिनांक | न्यायालय (जिल्हा / तालुका) |
|---|---|---|
| | | |

**प्रति,**
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

आयडेंटी साईज आकाराचा फोटो

विषय :- जिल्हा परिषद, कोल्हापूर विधीज्ञ पॅनेलवर ------------------------------ या न्यायालयासाठी नियुक्ती होणेबाबत.

१) संपूर्ण नांव (विधीज्ञ व्यवसायात वापरात असणारे नमूद करावे) :-

| आडनांव | प्रथम नांव | वडील / पतीचे नांव |
|---|---|---|
| | | |

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्र. :- ई-मेल आय डी :-

३) जन्म तारीख :-

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

४) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वय :- ------- वर्षे

५) सनद प्राप्त झाल्याची तारीख :- / /

६) तालुकास्तरीय न्यायालयासाठी अर्ज केला असल्यास :- तालुका -

७) शैक्षणिक अर्हता तपशिल :-

| अ.क्र. | उत्तिर्ण परिक्षा | विद्यापीठ / मंडळ | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८) विधीज्ञ व्यवसाय अनुभव तपशिल :-

| अ.क्र. | न्यायालय प्रकार | वकीलीचा कालावधी | | एकूण कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| | | | | |
| | | | | |

९) इतर उल्लेखनीय बांबी :- ------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**प्रतिज्ञापत्र**

मी असे प्रमाणित करतो/करते की, जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत नवीन विधीज्ञ पॅनेल नेमणूक करण्याबाबतची संपूर्ण जाहिरात मी वाचली असून जाहिरातीमधील सर्व नमूद बांबी, अटी/शर्ती मला मान्य आहेत. तसेच मी असेही प्रमाणित करतो/करते की, वरिल अर्जात नमूद केलेली सर्व माहिती खरी व बरोबर आहे, माहिती खोटी / चुकीची आढळून आल्यास माझी विधीज्ञ पॅनेलवरील निवड रद्द होईल याची मला जाणीव आहे व याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

स्थळ :- विधीज्ञ स्वाक्षरी

दिनांक :- / / नांव :-

**महत्वाची सूचना** :- जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींचे पुष्ठ्यर्थ आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांची अॅटेस्टेड प्रत जोडणेत यावी तसेच अर्जातील माहिती ही परिपूर्ण भरावी. अपूर्ण अर्ज व आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास अर्ज अपात्र ठरविणेत येईल.

Scanned with CamScanner